महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६८ /२०२२ दि. २६/०८/२०२२

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** कल्याण शहरात दि. ३१/०८/२०२२ ते ०९/०९/२०२२ या कालावधीत गणेशोत्सव हा सण साजरा होणार असून दि. ०१/०९/२०२२ (दिड दिवसांचे), दि. ०४/०९/२०२२ (पाच दिवसांचे गौरी गणपती विसर्जन), दि. ०५/०९/२०२२(गौरी गणपती विसर्जन) दि.०६/०९/२०२२ (सात दिवसांचे) दि.०७/०९/२०२२ (सार्वजनिक गणेशोस्तव मेळा संघ व एकादशी विसर्जन), दि. ०८/०९/२०२२ (नऊ दिवसांचे) दि.०९/०९/२०२२ (अनंत चर्तुदशी) या कालावधीत गणेश मुर्तीचे विसर्जन होणार आहे.नमुद विसर्जन मार्गावर तसेच परिसरात वाहतूक कोंडी होवू नये. तसेच सदर भागात वाहतूक सुरळीत व सुनिश्चित रहावी या करिता आमजनेतच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी, दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१ अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे

| | |
|---|---|
| NO PARKING ZONE - | १) आधारवाडी सर्कल ते दुर्गामाता चौक, सहजानंद चौक ते दुर्गामाता चौक तसेच दुर्गामाता चौक ते उर्दु स्कुल या दरम्यान सपुर्ण रोड सर्व प्रकारच्या वाहनासाठी NO PARKING ZONE करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | २) कोनगांव कडून दुर्गाडी मार्गे कल्याण शहराचे दिशेने येणारी सर्व प्रकारची हलकी वाहने ही वाडेघर चौक/आधारवाडी चौकातून ( दुर्गाडी चौक व परिसरातील मार्गावर गणेशममुर्ती विसर्जन मिरवणूकामुळे रहदारीची कोंडी झाल्यास ) इच्छीत स्थळी जातील. |
| **पर्यायी मार्ग–** | ३) कोळशेवाडी कडून कोनगांवच्या दिशेने जाणारी सर्व हलकी वाहने ही गोविंदवाडी बायपास नाक्यावरून गोविंदवाडी मार्गे इच्छीत स्थळी जातील. |
| **पर्यायी मार्ग–** | ४) कोनगांव बाजूकडून डोंबिवली–मानपाडा–कल्याण फाटा–शिळफाटा च्या दिशेने जाणारी सर्व हलकी वाहने ही दुर्गाडी पुलाकडून रोडच्या विरूध्द दिशेच्या लेनवरून दुर्गाडी–गोविंदवाडी बायपास मार्गाने इच्छीत स्थळी जातील. |
| NO PARKING | ५) दुर्गामाता चौक ते लाल चौकी नाका दरम्यानचा मार्ग हा NO PARKING ZONE करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | ६) कोनगांव गणेश घाट व दुर्गाडी गणेश घाट येथील गणेशमुर्ती विसर्जन मिरवणूकांमुळे रहदारीची कोंडी झाल्यास या मार्गाची वाहतुक पर्यायी मार्ग म्हणून कल्याण शहरातून गांधारी पुल मार्गे येवई नाक्याकडे व कल्याण कडे येण्यासाठी येवई नाका वरून–गांधारी पुल मार्गे अशा प्रकारे मार्गक्रमण करतील. |

**जड अवजड वाहनांसाठी कल्याण शहरात प्रवेश बंद बाबत :–**

१) कल्याण शहरा अंतर्गत मार्गावरून जड–अवजड वाहनांचे वाहतुकीस या कार्यालयाकडून यापुर्वी निर्गमीत करण्यात आलेली वाहतुक नियंत्रण अधिसुचना क्र. ६६/२०१८ दि. १०/०९/२०१८ अन्वये देण्यात आलेली सुट ही गणेश मुर्ती विसर्जनाचे दिवशी सकाळी ०८.०० वा. पासून गणेशमुर्ती विसर्जन कार्यक्रम संपे पावेतो रद्द करण्यात येत असून जड–अवजड वाहतुकीस पुर्ण पणे मनाई करण्यात येत आहे.

सदरची अधिसचुना ही गणेश मुर्ती विसर्जनाच्या दिवशी म्हणजे ही ३१/०८/२०२२ ते ०९/०९/२०२२ या कालावधीत गणेशोत्सव हा सण साजरा होणार असून दि. ०१/०९/२०२२ (दिड दिवसांचे), दि. ०४/०९/२०२२ (पाच दिवसांचे गौरी गणपती विसर्जन), दि. ०५/०९/२०२२(गौरी गणपती विसर्जन) दि.०६/०९/२०२२ (सात दिवसांचे) दि.०७/०९/२०२२ (सार्वजनिक गणेशोस्तव मेळा संघ व एकादशी विसर्जन), दि.०८/०९/२०२२ (नऊ दिवसांचे) दि.०९/०९/२०२२ (अनंत चर्तुदशी) रोजी सकाळी ११.०० वा.पासुन ते गणेशमुर्ती विसर्जन कार्यक्रम संपेपर्यत अंमलात राहील.

सदरची अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रुग्णवाहिका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने व गणपती मुर्ती विसर्जनाच्या वाहनांना यांना लागू राहणार नाही.

( दत्तात्रय कांबळे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

प्रति,

जिल्हा प्रसिध्द अधिकारी, ठाणे.

२/— सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे.
मा.आयुक्त, कल्याण—डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.

प्रत कार्यवाहीसाठी :—
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे/भिवंडी/कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३,कल्याण, परिमंडळ—४, उल्हासनगर व विशेष शाखा,ठाणे

प्रत:— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :— सपोआ कल्याण ,उल्हासनगर वाहतूक विभाग.
प्रभारी अधिकारी, कल्याण/कोळसेवाडी/उल्हासनगर ,विठ्ठलवाडी वाहतूक उपविभाग.
२/— म.न.पा.कल्याण—डोंबिवली च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner